महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२९५९३८१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/२०२४-२५/२३६४ दिनांकः- १३/०९/२०२४

## मातोश्री मुलींचे वसतीगृह, नाशिक येथील महाज्योती संस्थेमार्फत निवड झालेल्या मुलींच्या प्रवेशाबाबत परिपत्रक

मा. जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शासन निर्णय क्रमांकः वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, यात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे.

वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्याकरिता दि.०८.०३.२०२३ ते दि.१५.०९.२०२३ या कालावधीत अर्ज मागविण्यात आलेले होते. महाज्योती संस्थेकडे दि.१५.०९.२०२३ या अंतिम दिनांकापर्यंत एकूण ९८ अर्ज प्राप्त झालेले होते त्यापैकी २३ विद्यार्थिनींने प्रवेश घेतलेला आहे. रिक्त जागा भरण्यासाठी दि.३०.०८.२०२४ ते ०३.०९.२०२४ पर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती दरम्यान एकूण ३८ अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त अर्जांची तपासणी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आलेली आहे.

१) विद्यार्थ्यांचे आधारकार्ड झेरॉक्स
२) विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
३) जात प्रमाणपत्र
४) गुणपत्रिका
५) पालकांचा उत्पन्नाचा दाखला
६) रहिवासी दाखला
७) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत
८) शाळा सोडल्याचा दाखला
९) बोनाफाईड/शैक्षणिक शुल्क भरणा पावती

त्यानुसार छाननी केलेल्याप्रमाणे चार प्रकारच्या याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | यादी | शेरा |
|---|---|---|
| १. | पात्र विद्यार्थिनींची यादी | वसतीगृह प्रवेशासाठी पात्र |
| २. | अपात्र विद्यार्थिनींची यादी | महाज्योती कार्यालयास ऑनलाईन अर्ज केलेला नाही. |
| ३. | अर्ज व कागदपत्रे त्रुटी असलेल्या विद्यार्थिनींची यादी | महाज्योती प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे अर्ज किंवा कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मुदत्त देण्यात येत आहे. |
| ४. | प्रतीक्षा यादी | NT-D प्रवर्गातील जागा रिक्त नाहीत. प्रवेशीत विद्यार्थिनींने प्रवेश रद्द केल्यास उपलब्ध असलेल्या विद्यार्थिनीचा विचार केला जाणार याची विद्यार्थिनींने नोंद घ्यावी. |

तरी खालील अटी व शर्तीच्या आधारे पात्र व अपात्र तसेच त्रुटी पूर्तता करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

१. पात्र विदयार्थिनींनी आपला प्रवेश हा दि. २०.०९.२०२४ पूर्वी लेखी स्वरुपात अर्ज, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र व प्रवेशित शैक्षणीक वर्षाचे मूळ बोनाफाईड जमा करुन प्रवेश निश्चित करून घ्यावे. ज्या विदयार्थिनी दि. २०.०९.२०२४ पूर्वी प्रवेश निश्चित करणार नाही अश्या विदयार्थिनी प्रवेश घेणेसाठी इच्छूक नाही असे समजून पुढील कार्यवाही करणेत येईल.
२. अपूर्ण कागदपत्रांअभावी अद्याप प्रवेश न दिलेल्या विद्यार्थिनीनी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता दि. २०.०९.२०२४ पर्यंत महाज्योती विभागीय कार्यालय, नाशिक **(पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण कार्यालय, नाशिक-पुणे रोड, नाशिक. संपर्क-८०८७५७६३९३)** येथे प्रत्यक्ष उपस्थीत राहून करावी. विहीत मुदतीत कागदपत्रांची पूर्तता न केल्यास अश्या विद्यार्थिनी प्रवेश घेणेसाठी इच्छूक नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
३. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रूटी/अडचणी उदभवल्यास अश्या विद्यार्थांनीचा प्रवेश हा रद्द करणेत येईल.
४. वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी अद्ययावत (latest) सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणेत यावे.
५. पात्र विदयार्थिनींना व त्यांचे पालकांना वेळोवेळी वसतिगृहाकडून निर्गमीत करणेत येणारे हमीपत्र हे लेखी स्वरुपात भरुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाज्योती व सारथी कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अटी व शर्ती पाळणे बंधनकारक राहील.
६. कोणत्याही टप्प्यावर अंतिम निर्णय घेण्याचा व त्यात आवश्यक बदल करण्याचा अधिकार हा महाज्योती संस्था प्रशासनाचा राहील व तो विद्यार्थीनीना बंधनकारक राहील.

स्वाक्षरीत /-
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर